आज जगातील प्रत्येक ठिाणी भ्रष्टाचार, असंजीवनकाळातील मंडळी आणि लाचखोरी हाच मापदण्ड असल्याचे दिसून येतेजग ह्यााचप्रकारे चालत असल्याचे दिसून येते कारण त्यांस तसेच शिकविण्यात आले आहे; यापेक्षा उत्तम काय ते त्यांस माहीत नाही. तथापि, जेव्हा आपण देवाच्या लोकांमध्ये —आमच्यात — असंजीवनकाळातील मंडळी, अनीतिमानता आणि सत्याची उणीव पाहतो, तेव्हा खरोखर दुःख वाटते — कारण कमीत कमी आपण चांगले वागायला हवे.

खरेपणाने, प्रामाणिकपणे, शुद्धतेने आणि नीतिमत्वाने कसे चालावे हे आपणास माहीत असावयास हवे, कारण याविषयी आपण देवाच्या वचनात वाचतो. याहीपेक्षा वाईट हे आहे की आपण पाळकांत, सुवार्तिकांच्या, शिक्षकांच्या आणि वचनाची सेवा करणाऱ्यांच्या जीवनांत अनीतिमानता, असंजीवनकाळातील मंडळी आणि सचोटीची उणीव पाहतो. आमच्यापैकी प्रत्येकास अशा ठिकाणी येऊन पोहोचण्याची गरज आहे जेथे आपण संजीवनकाळातील मंडळी, सचोटी आणि नीतिमत्व यांस पूर्णपणे समर्पित राहू, आणि हे पुस्तक या गुणांस आमच्यात प्रोत्साहन देईल

आशीष रायचूर

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org




# संजीवनकाळातील मंडळी

''...आणि प्रभु तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे'' (प्रेषितांची कृत्ये २:४७).

आशीष रायचूर

**केवळ विनामूल्य वाटपासाठी**

ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारत द्वारे मुद्रित आणि वितरित।
प्रथम आवृत्ती मुद्रित, अक्तूबर 2018

**सम्पर्क**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: www.apcwo.org

विशेष उल्लेख वळगता, पवित्र शास्त्राचे सर्व संदर्भ बायबल सोसायटी ऑफ इंडिया द्वारा प्रकाशित बायबलमधून घेण्यात आले आहेत.

**आर्थिक भागीदारी**

ह्या पुस्तकाचे विनामूल्य वाटप ऑल पीपल्स चर्चच्या सदस्यांच्या, भागिदारांच्या आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपणास ह्या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त झाला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांचे मुद्रण आणि वाटप यात मदत व्हावी म्हणून आर्थिकरित्या सहाय्य करण्यास आपणास निमंत्रित करतो. कृपया apcwo.org/give ह्या संकेतस्थळावर जाऊन आपले दान कसे पाठवावे हे पाहण्यासाठी ह्या पुस्तकाच्या मागे देण्यात आलेले ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाकयादी**

जर आपणास आमची नवीन पुस्तके मिळविण्यासाठी आपले नाव आमच्या डाकयादीत हवे असेल तर कृपया ईमेलद्वारे आपला योग्य पत्ता पाठवावा : contact@apcwo.org

**भारतात विनामूल्य बल्क ऑर्डर**

आपल्या स्थानिक मंडळीत, बायबल अभ्यासगटांत, बायबल कॉलेज, सेमिनार, सभांत, पुस्तकालयांत, व्यापार केन्द्रांत वाटपासाठी आम्ही आनंदाने आपली पुस्तकें विनामूल्य पाठवू इच्छितो. कृपया ईमेलद्वारे पुस्तकांची संख्या आणि प्राप्त करणाऱ्यांचा पत्ता पाठवावा : contact@apcwo.org

(Marati book - A Church in Revival)

## ऑल पीपल्स चर्च
## बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षण केंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज और सेवा प्रशिक्षण केंद्र (एपीसी–बीसी) भारतातील बँगलोर येथे आत्म्याने युक्त, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षण आणि सिद्धांताच्या दृष्टीने यथार्थ तसेच देवाच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासोबत पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विश्वासणाऱ्यांस सेवेसाठी तयार करते. सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास घडून यावा असा आमचा विश्वास आहे आणि दैवीय चारित्र्य, देवाच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कार्यांवर जोर दिला जातो – सर्वकाही देवाच्या निकट सान्निध्याने साध्य झाले आहे.

एपीसी–बीसीमध्ये यथार्थ शिकवणीव्यतिरिक्त आम्ही प्रत्यक्ष रूपात देवाची प्रीती, पवित्र आत्म्याचा अभिषेक आणि सान्निध्य व देवाचे अलौकिक कार्य यास महत्व देतो. कित्येक तरूण स्त्री आणि पुरुषांनी हे प्रशिक्षण प्राप्त केले आहे आणि त्यांना त्यांच्या जीवनातील पाचारण पूर्ण करण्यासाठी बाहेर पाठविण्यात आले आहे.

खालील तीन पदव्या दिल्या जातात :

Theology and Christian Ministry (C.Th.) या विषयात एकवर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) या विषयातं दोन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theologyand Christian Ministry(B.Th.) या विषयात तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

आठवड्याच्या प्रत्येक दिवशी, सोमवार ते शुक्रवारपर्यंत सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग घेतले जातात. विद्यार्थी, नोकरी करणारे, आणि गृहिणी हे सर्वच ह्याा वर्गात भाग घेऊ शकतात आणि 1 वाजेनंतर आपल्या कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असणाऱ्या स्त्रीपुरुषांसाठी वेगवेगळी वस्तीगृहे आहेत. विद्यार्थी दर आठवड्यास दोन ते पाच वाजेपर्यंत क्षेत्रीय कार्य, विशेष सेमिनारं, दुपारच्या वेळी प्रार्थना व उपासना यात वेळ घालवितात. दुपारच्या सभा घरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. सर्व विद्यार्थ्यांस प्रोत्साहन दिले जाते की त्यांनी आठवड्याच्या शेवटी एका किंवा त्यापेक्षा अधिक स्थानिक मंडळीत सेवा करावी.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम इत्यादींविषयी अधिक माहितीसाठी आणि अर्जडाऊनलोड करण्यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org/biblecollege**

संजीवन

# संजीवनकाळातील मंडळी

''...आणि प्रभु तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज
त्यांच्यात भर घालीत असे'' (प्रेषितांची कृत्ये २:४७).

# अनुक्रमणिका


परिचय ........................................................ ०१

१. यरूशलेमातील मंडळी...................................... ०३

ऐक्य आणि प्रार्थना यात जन्मास आली........................ ०३

'ते' 'हे' आहे ................................................... ०६

२. संजीवन काळातील मंडळी.................................. १३

वेळापत्रक मूलत: प्रभावित झाले ................................ १४

सामुदायिकतेची जाणीव — आपसात देणे—घेणे ............... १६

मंडळीची शीघ्रगतीने वाढ.......................................... १६

उल्लेखनीय चमत्कार ज्यामुळे सतत वाढ सुरू राहिली

छळ............................................................... १७

पापाचा कठोर न्याय.............................................. १८

अलौकिक प्रदर्शने आणि स्वर्गदूतांची भेट...................... २०

आंतरिक समस्येपासून वंचित नाही................................ २१

प्रत्येक जण अद्‌भुत कृत्ये करतो................................ २३

आग पसरते........................................................ २३

# परिचय

संजीवन देवाच्या भेटीचा समय आहे. हा पृथ्वीवर स्वर्गाचा वृष्टीचा समय आहे. संजीवनाच्या काळात सर्वकाही भिन्न असते! २००८ची जशी सुरूवात झाली, तसे आम्हाला प्रभूकडून हे वचन प्राप्त झाले की हे वर्ष आध्यात्मिक आणि भौतिक वृष्टीचे असेल. आम्ही ज्यात प्रवेश करणार होतो त्यापैकी प्रत्येक गोष्टट जरी आम्हाला माहीत नव्हती, तरी आम्हाला हे माहीत होते की देव म्हणत होता की हे वर्ष वृष्टीचे वर्ष असणार. त्यावर्षी पुढे आम्ही काही गोष्टी घडतानां पाहू लागलो. आणि आता आम्ही केवळ त्या गोष्टीकडे वाढत जात आहोत ज्याचे देवाने अभिवचन दिले आहे आणि संजीवन, आत्म्याची वृष्टी, स्वर्गाकडून भेटीच्या काळाचे स्वागत करण्यासाठी स्वतःचे स्थान ग्रहण करीत आहोत.

आम्ही प्रार्थना करतो आणि देवाजवळ विनंती करतो की त्याने संजीवन पाठवावे — वृष्टी अथवा भेट, पण जेव्हा संजीवन घडून येईल तेव्हा आम्ही त्यासाठी तयार आहोत का? जेव्हा संजीवन प्रकट होईल तेव्हा त्यासाठी आम्ही तयार असले पाहिजे!

जेव्हा संजीवन घडून येईल, तेव्हा मंडळी कशी दिसेल? आम्ही जेव्हा संजीवन काळात असू — जेव्हा स्वर्गीय वृष्टी होईल, देव आध्यात्मिकरित्या भेट देईल, तेव्हा आपल्या आणि माझ्या बाबतीत काय घडेल? एक निश्चित गोष्ट ही आहे की मंडळी तशीच दिसेल जशी आता आम्ही जाणतो. जेव्हा आम्ही रविवारी मंडळीत एकत्र येतो, तेव्हा आम्ही सामान्यतः पाळकांचा उपदेश संपेपर्यंत

थांबतो. आमच्यापैकी काही लोक उपदेश सुरू असतांना झोप देखील घेतात आणि मग घरी जातात! पण, जेव्हा देवाकडून, संजीवन येते तेव्हा मंडळी अत्यंत वेगळी असते! देवाच्या वृष्टीसाठी तयार असा!

# १

# यरूशलेमातील मंडळी

ह्या पुस्तकाचा हेतू हे चित्र दाखविणे अथवा दृष्टांत दाखविणे आहे की जेव्हा देव संजीवन पाठवील आणि जेव्हा आम्ही त्याच्याकडून आलेल्या संजीवनाच्या ऋतुमध्ये प्रवेश करू, तेव्हा मंडळीचे जीवन कसे असेल. आपण प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातील पहिल्या पाच अध्यायांचा अभ्यास करू या आणि यरूशलेमेत आलेल्या संजीवनातून — संजीवन ज्याने यरूशलेमेतील मंडळीस जन्म दिला — काही महत्वाचे मुद्दे घेऊ या! स्वर्गातून आलेल्या संजीवन काळात जन्मास आलेल्या यरूशलेमेतील मंडळीपासून आपण 'संजीवनाविषयी' आणि मंडळीचे जीवन कसे असेल याविषयी शिकू शकतो.

## ऐक्य आणि प्रार्थना यात जन्मास आली

संजीवनाच्या पूर्व—चिन्हांपैकी एक काय होते — स्वर्गातील वृष्टीत खरोखर पाऊल टाकता यावे यापूर्वी यरूशलेमेतील लोकांनी खरोखर काय तयारी केली होती? येशूने त्याच्या शिष्यांस आज्ञा दिली होती की त्यांनी यरूशलेमेत वाट पाहावी कारण संजीवन (पवित्र आत्म्याची वृष्टी) येणार होते. त्याने त्यांस निश्चित स्थान दिले होते आणि त्यांस वाट पाहण्यास सांगितले होते. पवित्र आत्म्याच्या वृष्टीच्या संजीवनाच्या पूर्व—चिन्हाचा उल्लेख प्रे. कृत्ये. १:१४ मध्ये करण्यात आला आहे.

**हे सर्व जण आणि त्यांच्यासह कित्येक स्त्रिया, येशूची आई मरीया व त्याचे भाऊ एकचित्ताने प्रार्थना करण्यात तत्पर असत** (प्रेषितांची कृत्ये १:१४).

यरूशलेमेतील सर्व १२० शिष्य एकचित्ताने प्रार्थना व विनंती करीत होते. दोन गोष्टींवर लक्ष देण्याची गरज आहे : पहिली आहे “एकचित्त” ज्याचा अर्थ आहे एक मन असणे. बायबल म्हणते की ते एकचित्ताने प्रार्थना करण्यात तत्पर असत. त्यांनी केवळ एकचित्ताने सुरूवात केली नाही, तर ते एकचित्त राहण्यात तत्पर राहिले. म्हणून, ऐक्य — एकत्र राहणे, एकचित्त असणे आणि एक हेतू असणे — अत्यंत आवश्यक आहे. एकाच गोष्टीकडे पुढे वाढणे अथवा एकाच गोष्टीप्रत जाणे, देवाच्या वृष्टी अंतर्गत येण्याची महत्वपूर्ण पूर्वपात्रता आहे. जेथे ऐक्य आहे अशा वातावरणात, पवित्र आत्म्याची वृष्टी होईल. देव तेथे आपले आशीर्वाद देण्याचे ठरवितो.

**पाहा, बंधूंनी ऐक्याने एकत्र राहणे किती चांगले व मनोरम आहे! ते मस्तकावर ओतलेल्या, अहरोनाच्या दाढीवर उतरलेल्या, त्याच्या वस्त्राच्या काठापर्यंत ओघळलेल्या बहुमोल तेलासारखे आहे; सीयोन डोंगरावर उतरणाऱ्या हार्मोन पर्वताच्या दहिवरासारखे ते आहे; कारण तेथे परमेश्वराने आशीर्वाद म्हणजे अनंतकालिक जीवन देण्याचे ठरविले आहे.** (स्त्रोतसंहिता १३३:१—३).

याचा अर्थ हा आहे की पवित्र आत्म्याच्या वृष्टीत प्रवेश करण्याची तयारीची प्रक्रिया म्हणून तुम्ही आणि मी आत्म्याचे ऐक्य राखून ठेवण्याच्या प्रयत्नात चालले पाहिजे, आपण हा सामान्य हेतू

आपल्यापुढे ठेवला पाहिजे — की आपण देवासाठी भूकेले आहोत आणि त्याचे आधिक्य आम्हास हवे आहे. जेव्हा देवाचे लोक ऐक्यात एकत्र येतात — मग त्यांचे नाव, डिनॉमिनेशन अथवा सैद्धांतिक मतभेद काहीही का असेना — देवाचा धावा करण्याच्या केवळ एका हेतूने लहानसहान तक्रारी आपण दूर ठेवू, तेव्हा त्याच्या आत्म्याच्या सान्निध्याची आणि सामर्थ्याची सामर्थ्यवान वृष्टी होईल. लहानांपासून मोठ्यापर्यंत, सर्वांवर, नखशिखापर्यंत, अभिषेकाची, ताजेपणाची, आशीर्वादाची आणि जीवनाची वृष्टी होईल!

दुसरा मुद्दा हा आहे की यरूशलेमातील मंडळीत प्रार्थना व विनंती होत असे. ते प्रार्थनेत, विनंती व मध्यस्थी करण्यात तत्पर होते. ते एकचित्ताने एकजूट झाले होते आणि प्रार्थना व विनंती सादर करीत होते — जी देवाच्या वृष्टीची पूर्व—चिन्हे आहेत.

पुढील पन्नास वर्षे मंडळीच्या सभांत भाग घेणे, दर रविवारी दोन तास बसून अद्‌भुत संदेश ऐकणे, चांगले वाटणे, देवाच्या ज्ञानात वाढणे, पण देवाचा अनुभव न घेणे ज्यास आम्ही जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत, यात काहीही अर्थ नाही. देवाच्या ज्ञानात वाढणे आणि त्याचा अनुभव घेणे ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. ख्रिस्ती जीवन हे केवळ ज्ञानावर आधारित नाही; तर तो देवासोबत एक अनुभव आहे. आम्ही केवळ मंडळीच्या सभांत भाग घेऊन थकलेच पाहिजे आणि देवाच्या आधिक्याची तीव्रतेने इच्छा धरली पाहिजे.

म्हणून मंडळी या नात्याने आमचा प्रतिसाद असला पाहिजे, “देवा,

आमचा एक सामान्य हेतू आहे; आम्हास तुझे आधिक्य हवे आणि आम्ही सर्वजण यात सहभागी आहोत, पूर्णपणे!” तथापि, आपण स्वार्थी महत्वाकांक्षा, शंका आणि प्रतिस्पर्धा याविरुद्ध स्वत:चे रक्षण केले पाहिजे. कारण, जर येथे स्वार्थी महत्वाकांक्षा असेल, तर ती शंका प्रेरित करील आणि शंका प्रतिस्पर्धेकडे नेईल, आणि प्रतिस्पर्धेमुळे फूट पडेल. या भावनांस जागा देता कामा नये, त्यांस प्रवेश देता कामा नये, कारण आपण एकजूट आहोत; एका हेतूप्रत एकचित्त आहोत — आम्हास देवाचे आधिक्य हवे आहेत!

## ‘ते’ ‘हे’ आहे

**नंतर पेन्टेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला तेव्हा ते सर्व एकत्र जमले असतांना, अकस्मात मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारखा आकाशातून नाद झाला व ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले. आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एकएक अशा बसल्या. तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषातून बोलू लागले** (प्रेषितांची कृत्ये २:१—४).

“नंतर पेन्टेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला तेव्हा ते सर्व एकत्र जमले असतांना, अकस्मात...” (प्रेषितांची कृत्ये २:१, २अ). लक्ष देऊ या की त्यांचा एकच हेतू होता आणि त्यात ते एक होते. ते एकचित्त होते, एका जागी होते आणि अचानक स्वर्ग उघडला आणि देवाने त्यांच्यावर अग्नी मुक्त केला. हे ते होते — आत्म्याची वृष्टी सुरू झाली होती!

हे होईल असे येशूने अभिवचन दिले होते आणि त्याचा आरंभ झाला. यरूशलेमात पेन्टेकॉस्टच्या दिवसाचा उत्सव साजरा करण्यासाठी हजारो यहूदी यरूशलेमात एकत्र होते. इतिहासकारांचे म्हणणे आहे की यहूदी लोकांची संख्या शेकडो हजारो असली पाहिजे. आणि मग माळीवरील खोलीत असलेल्या १२० शिष्यांमध्ये काहीतरी अद्‌भुत असे घडले. ते विचित्र भाषांत बोलू लागले आणि मग वार्ता पसरली असेल. लगेच लोकांची मोठी गर्दी बाहेर एकत्र झाली त्यांनी ह्या लोकांना निरनिराळ्या भाषेत बोलतांना आणि देवाचे उपकारस्तवन करतांना ऐकले. मग गर्दीला काहीतरी समजाविण्याची गरज पेत्राला भासली आणि म्हणून तो उभे राहून म्हणाला, "परंतु योएल संदेष्ट्याने सांगितले होते ते हे आहे..." (प्रे. कृत्ये २:१६). 'ते हे आहे' असे म्हणण्याद्वारे, पेत्र पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने म्हणत होता की त्या दिवशी यरूशलेमात जे घडत होते, त्याविषयी योएल संदेष्ट्याने जुन्या करारात सांगितले होते.

**"यानंतर असे होईल की मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील, तुमच्या तरुणांस दृष्टांत होतील. तुमचे दास व दासी यावरही त्या समयी मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन"** (योएल २:२८,२९).

पेत्राने खरोखर काय म्हटले होते? त्याने म्हटले, "ते हे आहे!" परंतु जर आपण ह्या वचनाकडे पाहिले, तर आपण असा निष्कर्ष काढू शकतो की 'हे' 'ते' **नव्हते.** का? कारण योएल संदेष्ट्याने

म्हटले, “तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील, तुमच्या तरुणांस दृष्टांत होतील.” पण १२० लोक काय करीत होते? त्यांना दृष्टांत घडले नाहीत, स्वप्ने पडली नाहीत अथवा संदेश मिळाले नाहीत. तर, मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारखा आकाशातून नाद झाला, अग्नीच्या जिभा दिसल्या आणि लोक निरनिराळ्या भाषा बोलू लागले. म्हणून ‘हे’ खरोखर ‘ते’ नव्हते! जेव्हा मी हर्मेन्यूटिक्स (भाष्यशास्त्र) शिकवितो — पवित्र शास्त्राचा बिनचूक अर्थ कसा लावावा — तेव्हा मी माझ्या विद्यार्थ्यांस सांगतो की त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक त्या वेळच्या ग्रीकचा, इतिहासाचा आणि संस्कृतीचा अभ्यास करावा. म्हणून जे काही होत होते त्याचे जर माझ्या स्वभाविक बुद्धीने विश्लेषण केले, तर माझा निष्कर्ष असेल “ते हे नाही!” योएलने “मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्याच्या नादाविषयी” म्हटले नव्हते. योएलने “अग्नीच्या जिभा” अथवा “निरनिराळ्या भाषा बोलणे” याविषयी देखील भविष्य कथन केलेले नव्हते. पेन्टेकॉस्टच्या दिवशी जी चिन्हे घडून आली ती योएलच्या संदेशात नव्हती. पण पवित्र आत्मा पेत्राद्वारे म्हणत होता “ते हे आहे.” याविषयी माझ्या बौद्धिक विश्लेषणाचा निष्कर्ष नाहीसा होतो!

येथे आपणास दोन मुख्य तर्क करण्याची गरज आहे : सर्वप्रथम, देव त्याच्या वचनापेक्षा — बायबलपेक्षा मोठा आहे. आपण बरेचदा देवास त्याच्या वचनात सामावण्याचा प्रयत्न करतो. देव त्याने लिहिलेल्या बायबलपेक्षा मोठा आहे. जे पुस्तक त्याने लिहिले ते त्याच्या, म्हणजे अनंत परमेश्वराचा लहानशा भागाचे वर्णन करते. माझा जितका विश्वास आहे त्यानुसार बायबल हे परिपूर्ण, ईश्वरप्रेरित

आणि पृथ्वीवरील आमच्या जीवनासाठी अंतिम अधिकार आहे. मला माहीत आहे की बायबल अमर्याद देवाचे पूर्णपणे वर्णन करीत नाही. देव कधीही त्याच्या वचनाचा विपर्यास करीत नाही. जे काही त्याने प्रकट केले आहे त्याबाबतीत तो नेहमीच खरा राहील. पण तो लिखित वचनापेक्षा अत्यंत मोठा आहे.

कधी कधी जेव्हा आम्ही पवित्र शास्त्राचे विश्लेषण करतो, तेव्हा 'हे'चा अर्थ 'ते' होत नाही, पण देव म्हणतो की 'हे' 'ते' आहे. कारण जेव्हा योएल आत्म्याच्या कार्याविषयी बोलला तेव्हा त्याने आत्म्याच्या सर्व कार्यांची सविस्तर यादी दिली नाही, तो केवळ एक निदर्शक यादी देत होता — दृष्टांत, संदेश (भविष्यवाणी) आणि स्वप्न. आणि पेन्टेकॉस्टच्या दिवशी जे घडले, ते सुद्धा आत्म्याचे कार्य होते, आणि दुसरी कामे — वाऱ्याच्या सुसाट्याचा शब्द, अग्नीच्या जिभा आणि निरनिराळ्या भाषा बोलणे, ती सुद्धा आत्म्याची कार्ये होती. म्हणून 'हे' 'ते' आहे. आमेन!

जेव्हा संजीवन येते, तेव्हा आम्ही बुद्धीने व प्रकटीकरणात चालले पाहिजे. आम्हास दोन्ही गोष्टींची गरज आहे. कधी कधी आपण केवळ बुद्धीने बोलतो, पण प्रकटीकरण नसते. आम्ही पवित्र शास्त्राचा सर्व इतिहास जाणतो — इब्री, ग्रीक आणि बाकी सर्वकाही. आम्हाला बरेचदा माहीत असते की 'योग्य गोष्ट' काय आहे, पण देवाची 'आताची गोष्ट' काय आहे याचे प्रकटीकरण आमच्याजवळ नसते. अशाप्रकारे आमच्याजवळ 'योग्य गोष्ट' असते जी आहे द्राक्षरसाचे बुंधले, पण 'आताची गोष्ट' आहे नवा द्राक्षरस. जर आमच्या बुंधल्यात नवा द्राक्षरस मावत नसेल, तर आम्हाला नवा

द्राक्षरस प्राप्त करता येणार नाही. देव 'आता' जे काही करीत आहे ते ओळखून त्याचे स्वागत करण्यासाठी आणि त्यामध्ये चालण्यासाठी, आम्हाला बुद्धी आणि प्रकटीकरणाची गरज आहे. 'आताचा' शब्द निश्चितपणे कधीही लिखित वचनाशी विसंगत असणार नाही, त्याचे खंडन करणार नाही, पण देव जे काही करीत आहे ते समजण्यासाठी आमच्याजवळ 'आताचा' शब्द असला पाहिजे.

पेत्राच्या "हे ते आहे" या विधानावर आधारित दुसरी महत्वाची गोष्ट जी आम्ही सांगण्याची गरज आहे, ती ही आहे की दोन संजीवने अथवा वृष्टी कधीही समान राहत नाही! त्यांत साम्य असू शकते, पण ते समान नसू शकतात. योएलने देवाच्या आत्म्याच्या वृष्टीचे वर्णन केले. पेन्टेकॉस्टच्या दिवशी जे घडले ती देवाच्या आत्म्याची खरी वृष्टी होती. देव म्हणू शकतो, "ही वृष्टी आहे; हे संजीवन आहे," पण आपण म्हणू शकतो 'हे' अगदी 'ते' दिसत नाही! आपण संजीवनांच्या इतिहासाचा अभ्यास करू शकतो, धडे शिकू शकतो, संजीवनाचे नमूने वेचू शकतो, पण आम्ही देवाला एका साच्यात बंदिस्त करून असे म्हणू शकत नाही की संजीवन अगदी तसेच घडले पाहिजे जसे आणखी कुठल्या ठिकाणी घडले! देवाच्या आत्म्याच्या वृष्टीत प्रगती करीत असतांना आम्ही देवासमोर आपले अंत:करण पूर्णपणे मोकळे ठेवले पाहिजे. आम्ही हे समजले पाहिजे की देव आता आमच्यामध्ये काय करू इच्छित आहे. आम्ही स्वत:ला असे प्रश्न विचारले पाहिजेत की, "मंडळी या नात्याने देव आम्हास कोठे नेत आहे? ह्या शहराकरिता देवाची इच्छा काय आहे?" आमच्या शहरातील संजीवन हे जगाच्या पाठीवरील आणखी कुठल्या ठिकाणी देवाने जे संजीवन पाठविले

त्याची हुबेहूब प्रत असणार नाही. ते अगदी नवे असेल आणि तरीही ते संजीवन आहे, देवाची भेट आहे, स्वर्गातून झालेली वृष्टी आहे!

प्रेषितांची कृत्ये २मध्ये जे लिहिले आहे, त्यावरून आपण पाहतो की ह्या वृष्टीचा परिणाम म्हणून मंडळीचा जन्म घडून आला! खरे म्हणजे, ही अगदी पहिली स्थानिक मंडळी होती.

**तेव्हा ज्यांनी त्याच्या संदेशाचा स्वीकार केला त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीन हजार माणसांची भर पडली** (प्रेषितांची कृत्ये २:४१).

रात्रभरात, ३००० लोकांची मंडळी (चर्च) सजीव झाली! बरेचदा, मी ही कल्पना करण्याचा प्रयत्न करतो की हे कसे असले पाहिजे — तत्कालीन प्रेषितांच्या जागी असणे कसे वाटत असावे! त्यांच्याजवळ एखाद्या सेमिनारची पदवी नव्हती, 'चर्च व्यवस्थापन,' 'मंडळीच्या वाढीचे सिद्धांत,' इत्यादी विषयांवर त्यांना शिकवण मिळाली नव्हती, अगदीच काही नाही, आणि तरीही रात्रभरात त्यांच्या मंडळीत ३००० लोक आलेत! तेथे कुठलेही नियोजन नव्हते, कुठलेही धोरण नव्हते, कुठल्याही पूर्वसूचना नव्हत्या, अनुसरण करावयास कुठलाही नमूना नव्हता, कुठलेही जी—१२ सेल ग्रूप्स नव्हते — अगदी काहीच नाही — पण जवळजवळ एका क्षणात मंडळी जन्मास आली!

मी शिकवण मिळविण्याचे अथवा योजना अथवा धोरण आखण्याचे महत्व कमी करीत नाही. मी आपल्या अंत:करणावर हे ठसविण्याचा

प्रयत्न करीत आहे की : “जर देव एखादी गोष्ट अनपेक्षितरित्या करीत असेल, तर आपण त्याचे अनुसरण करू या!” देव नेहमीच आमच्या योजनेद्वारे आणि आमच्या उत्तम धोरण आखण्याद्वारे येत नाही! शिक्षित लोक म्हणून, आम्हाला आपल्या बुद्धीचा उपयोग करण्याची अत्यंत सवय आहे आणि येथेच आमच्यापैकी कित्येकांसाठी हे समजण्याचा प्रयत्न करण्याचा संघर्ष सुरू होतो की देव काय करीत आहे. जर देव अनपेक्षितरित्या काही करणार असेल, तर आपण त्यासोबत जाऊ या!

# २

# संजीवनकाळातील मंडळी

यरूशलेमातील मंडळीचा जन्म संजीवनात झाला. म्हणून हे समजण्यासाठी की संजीवनातील मंडळी कशी दिसेल, यरूशलेमातील मंडळी हा एक मोठा नमूना आहे. पवित्र आत्म्याची वृष्टी प्राप्त करीत असतांना आणि संजीवनाचा अनुभव घेत असतांना काय अपेक्षा करावी याविषयी आपण काही धडे शिकू शकतो. प्रेषितांची कृत्ये याचे पहिले आठ अध्याय यरूशलेमेच्या मंडळीच्या पहिल्या १२ वर्षांची माहिती देतात.

देव त्यांच्यामध्ये जे मुक्त करीत होता त्यांत ते दररोज वाढत गेले.

**ते प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासात, भाकर मोडण्यात व प्रार्थना करण्यात तत्पर असत. तेव्हा प्रत्येक मनुष्याला भय वाटले; आणि प्रेषितांच्या हातून पुष्कळ अद्‌भुत कृत्ये व चिन्हे घडत होती. तेव्हा विश्वास ठेवणारे सर्व एकत्र होते, आणि त्यांचे सर्व काही समाईक होते. ते आपआपली जमीन व मालमत्ता विकून जसजशी प्रत्येकाला गरज लागत असे तसतसे सर्वांना वाटून देत असत. ते दररोज एकचित्ताने व तत्परतेने मंदिरात जमत असत, घरोघरी भाकर मोडीत असत, आणि देवाची स्तुति करीत हर्षाने व सालस मनाने जेवीत. सर्व लोक त्यांना प्रसन्न असत आणि प्रभु तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे (प्रेषितांची कृत्ये २:४२—४७).**

**आम्हास दिसून येते की, ते प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासात, भाकर मोडण्यात व प्रार्थना करण्यात तत्पर असत** (प्रेषितांची कृत्ये २:४२).

**ते दररोज एकचित्ताने व तत्परतेने मंदिरात जमत असत, घरोघरी भाकर मोडीत असत, आणि देवाची स्तुती करीत हर्षाने व सालस मनाने जेवीत (प्रेषितांची कृत्ये २:४६).**

**आणि दररोज मंदिरात व घरोघर शिकविण्याचे व येशू हाच खिस्त आहे ही सुवार्ता गाजविण्याचे त्यांनी सोडले नाही** (प्रेषितांची कृत्ये ५:४२).

ह्या लोकांनी यरूशलेमास लहानसा प्रवास करण्याचा बेत आखला होता आणि अचानक ते अशा गोष्टीत गुंतून गेले जी दररोज घडत होती. आम्ही आपल्या नियमित रविवारच्या सभेस जातो, अधूनमधून मंडळीच्या विशेष सभांत भाग घेतो, शांत जीवन घालवितो, जेथे सर्वकाही ठरविलेले असते. तशासारखे हे आहे. पण संजीवनात, दररोज काहीतरी होत असते! यरूशलेमातील मंडळीत देव जे काही करीत होता, ते रोजच्या आधारे त्या प्रवाहात पुढे जात होते — सात दिवसांतून एकदा नव्हे.

## वेळापत्रक मूलतः प्रभावित झाले

म्हणून ही कल्पना करणे अत्यंत सोपे आहे की त्यांचे वेळापत्रक मूलतः प्रभावित झाले होते. संजीवनात आमची वेळापत्रके प्रभावित होतात. ते थोडेफार विस्कळीत होऊ शकते. यरूशलेमातील लोकांनी आधीच त्यांच्या प्रवासाचा बेत केला असेल — एके सकाळी

पेन्टेकॉस्टच्या सणासाठी ते यरूशलेमास गेले असतील आणि दुसऱ्या दिवशी परतण्याचा त्यांचा बेत असेल आणि कदाचित त्यांनी दुसऱ्या दिवशी कामावर जाण्याचे ठरविले असेल! याचा विचार करा : ते यरूशलेमास आले आणि तेथे देवाच्या संजीवनाचा सामर्थ्यपूर्ण वर्षाव होता! त्यांच्या जीवनास देवाने स्पर्श केला आणि ३००० लोकांचे तारण झाले! त्यांचे वेळापत्रक गडबडले!

काहीतरी त्यांना सकाळी आणि संध्याकाळी देवाचा धावा करण्यासाठी आणि उपकारस्तवन करण्यासाठी मंदिराकडे ओढत होते. जेव्हा संजीवनाचा उद्रेक होतो, तेव्हा वेळापत्रक बदलून जाते. मला हे सुचवायचे नाही की आपण कामावर जाऊ नये. मला हे म्हणावयाचे आहे की अशा गोष्टी घडतील ज्यामुळे आमचे वेळापत्रक बदलून जाईल. आम्हाला हे जाणून संजीवनात प्रवेश करावयाचा आहे की आम्ही अशा ऋतूंत आहोत जेथे देव आमच्यामध्ये कार्य करीत आहे. देव जे काही मुक्त करू इच्छितो त्याचा पाठपुरावा करण्यासाठी आमच्या वेळापत्रकाची पुन्हा जुळवणी करण्यासाठी आपणास तयार राहण्याची गरज आहे. आमच्यापैकी अनेक जण प्रार्थना करीत असतील, “देवा, आम्हाला संजीवन हवे आहे, आपल्या आत्म्याची वृष्टी पाठव! आम्हाला संजीवन दे, देवा!” पण जर देवाने येऊन आमचे वेळापत्रक बदलले, तर आम्ही म्हणू, “आम्हाला संजीवन हवे आहे, पण आमच्या वेळापत्रकांस स्पर्श करू नकोस अथवा आमच्या जीवनात हस्तक्षेप करू नकोस, अडखळण आणू नकोस, प्रभु!” अथवा संजीवनासाठी आपल्या प्रार्थनांस देवाचे उत्तर प्राप्त करण्यासाठी आम्ही खरोखर तयार आहोत का?

## सामुदायिकतेची जाणीव — आपसात देणे—घेणे

**तेव्हा विश्वास ठेवणारे सर्व एकत्र होते, आणि त्यांचे सर्व काही समाईक होते. ते आपआपली जमीन व मालमत्ता विकून जसजशी प्रत्येकाला गरज लागत असे तसतसे सर्वांना वाटून देत असत** (प्रेषितांची कृत्ये २:४४,४५).

ह्या वृष्टीत यरूशलेमची मंडळी पुढे वाढत असतांना, आपण पाहतो की त्यांच्यात सामुदायिकतेची सखोल जाणीव होती — आपसात देणे—घेणे, सर्व वस्तूंत सहभागी करणे. अचानक ते दुपारचे व रात्रीचे जेवण एकत्र करू लागले, आणि कदाचित अशा लोकांसोबत प्रवास करू लागले ज्यांस ते पूर्वी ओळखत नव्हते. बायबल म्हणते की त्यांच्याजवळ सर्वकाही समाईक होते आणि ते आपसात देणे—घेणे करू लागले. तर संजीवनात काय होते? त्यामुळे खरोखर आमच्या जीवनात सामुदायिकतेची जाणीव होती. आम्ही आपल्या प्रवासांत सहभागी होऊ लागतो आणि आमच्या देण्यात, आमच्या मदत करण्यात आणि आमच्या एकत्रितपणात उत्स्फुर्तता येऊ लागते.

## मंडळीची शीघ्रगतीने वाढ

आपण यरूशलेमेतील मंडळीची शीघ्र वाढ देखील पाहतो. "... आणि प्रभु तारण प्राप्त होत असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत असे" (प्रेषितांची कृत्ये २:४७ब). आम्हाला रोजची निश्चित संख्या माहीत नाही, पण ती १०० अथवा २०० असेल अथवा फक्त १० असेल, पण बायबलमध्ये लिहिले आहे की

लोकांची रोज भर पडत होती. पेत्राच्या पहिल्या संदेशानंतर एका दिवसात ३००० लोकांची भर पडली (प्रे. कृत्ये २:४१). नंतर, लंगड्या माणसाला बरे केल्यानंतर, आणखी ५००० लोकांची भर पडली (प्रे. कृत्ये ४:४). खरोखर मंडळीची विस्फोटक वाढ! आज आमच्या शहरात अशा गोष्टी घडाव्या असे आम्हाला वाटत नाही काय?

## उल्लेखनीय चमत्कार ज्यामुळे सतत वाढ सुरू राहिली

आपण पाहतो की उल्लेखनीय चमत्कारांमुळे मंडळीची सतत वाढ होत राहिली. अनेक चिन्हे घडून आली, पण केवळ उल्लेखनीय चमत्कारांची प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात नोंद करण्यात आली आहे. एक व्यक्ती ४० वर्षांपासून लंगडा होता, तो बरा झाला (प्रे. कृत्ये ३:१—८). जे लोक आजारी होते ते दुरून येत, फक्त यासाठी की पेत्राची सावली त्यांच्यावर पडावी आणि त्यांनी बरे व्हावे!

**प्रेषितांच्या हातून लोकांमध्ये पुष्कळ चिन्हे व अद्‌भुते घडत असत; आणि ते सर्व एकचित्ताने शलमोनाच्या देवडीत जमत असत; आणि त्यांच्यात सामील होण्यास इतर कोणाचे धैर्य होत नसे, तरी लोक त्यांना थोर मानीत असत. विश्वास ठेवणारे पुष्कळ पुरुष व स्त्रिया ह्यांचे समुदाय प्रभूला मिळत गेले; इतके की लोक दुखणेकऱ्यांना रस्त्यात आणून पलंगावर आणि खाटावर ठेवीत; ह्यासाठी की, पेत्र येत असता त्याची सावली तरी त्यांच्यातील काही जणांवर पडावी. आणखी यरूशलेमेच्या आसपासच्या चोहोकडल्या गावातून लोकसमुदाय दुखणेकऱ्यांना**

**व अशुद्ध आत्म्यांनी पीडलेल्या घेऊन तेथे येत असत; आणि ते सर्व बरे होत असत** (प्रेषितांची कृत्ये ५:१२—१६).

म्हणून संजीवनकाळात आमच्यासोबतही हेच घडेल. विशेष चमत्कार घडून येतील. आमच्या जीवनात रोज घडून येणाऱ्या चमत्कारांबद्‌दल देवाचा धन्यवाद असो, पण विशेष चमत्कार घडून येतील जे संजीवनकाळात आमच्यामध्ये घडतील.

## छळ

संजीवनप्राप्त मंडळी छळास आकर्षित करते. जेव्हा आम्ही संजीवनकाळात असतो, तेव्हा कुठल्यातरी कारणाने छळ येतो. तर मग आम्हाला वृष्टी खरोखर हवी आहे का? पेत्र आणि योहानास सन्हेद्रिनने अटक केली आणि त्यांस धाक दिला की त्यांनी येशूच्या नावात सुवार्ता गाजविता कामा नये (प्रे. कृत्ये ४:१७—१८). प्रेषितांस तुरूंगात टाकण्यात आले (प्रे. कृत्ये ५:१७—१८). स्तेफनास दगडमार करून त्याचा वध करण्यात आला (प्रे. कृत्ये ७:५८). वृष्टीच्या वेळी, संजीवनकाळात छळ असामान्य नाही. पण प्रेषितांनी यास कसा प्रतिसाद दिला ते पाहा.

**परंतु पेत्र व योहान ह्यांनी त्यांना उत्तर दिले की, देवाच्याऐवजी तुमचे ऐकावे हे देवाच्या दृष्टीने योग्य की अयोग्य आहे हे तुम्हीच ठरवा; कारण जे आम्ही पाहिले व ऐकले ते न बोलणे हे आम्हाला शक्य नाही** (प्रेषितांची कृत्ये ४:१९,२०).

**ते तर त्या नावासाठी आपण अपमानास पात्र ठरविण्यात आलो म्हणून आनंद करीत न्यायसभेपुढे निघून गेले** (प्रेषितांची कृत्ये ५:४१).

प्रेषितांनी असे म्हटले नाही की ते देवाला स्वर्गाचे दार बंद करावयास अथवा ‘वृष्टी’ कमी करावयास सांगतील. त्याऐवजी देव जे काही करीत होता, त्याच्यासोबत जावयास ते प्रसन्न होते. देवाच्या आज्ञेचे पालन करण्यात ते आनंदित होते आणि प्रभु येशूच्या नावाप्रीत्यर्थ दु:ख सोसणे ही त्यांना सन्मानाची बाब वाटली. आम्ही सुद्धा प्रभु येशूच्या नावाप्रीत्यर्थ दु:ख सोसणे ही सन्मानाची बाब समजले पाहिजे!

आमच्यापैकी बहुतेकांनी सुखदायक ख्रिस्ती जीवन घालविले आहे. आम्हाला क्वचितच कधी छळ दिसून येतो. आम्ही आमच्या कामाच्या ठिकाणी ‘लहानशी गोष्ट’ अनुभवली असेल जसा आमचा सोबती वागतो — आम्ही विश्वासात आल्याचे त्याला कळून आल्यानंतर — तो आमच्याशी बोलत नसेल, आमच्यासोबत दुपारच्या जेवणास जात नसेल अथवा पूर्वी जसा तो आमच्यासाठी कॉफी आणत असे, तसा आणत नसेल. आणि आम्हाला वाटते की आम्हाला आमच्या विश्वासासाठी आमच्या कामाच्या ठिकाणी छळ सोसावा लागत आहे. प्रामाणिकपणे सांगावयाचे झाल्यास, ज्याला ‘छळ’ म्हणता येईल, असे काहीही आम्ही अद्याप पाहिलेले नाही. पण जर आपण म्हणत असू, “देवा, आम्हाला संजीवन हवे आहे,” तर आम्ही वाढत्या छळासाठी अगदी तसेच तयार असले पाहिजे, जसे यरूशलेमातील मंडळीने अनुभवले.

## पापाचा कठोर न्याय

आम्हा सर्वांस हे माहीत आहे की संजीवनाच्या वातावरणात कृपा, चमत्कार आणि कृपादानांची विपुलता असते जी देवाच्या लोकांमध्ये

पाठविली जातात. पण त्याचवेळी, पापाविरुद्ध त्वरित न्याय असतो. आमच्यापैकी कितीजण खोटे बोलण्यासाठी मरतात? जर असे घडले असते, तर येथे कोणीही जीवंत नसते. आज, जरी आम्ही सर्व जण विश्वासणारे आहोत, तरी आमच्यापैकी काही लोक अद्याप खोटे बोलतात, चोरी करतात आणि तरीही कोणी मरून पडत नाही! परंतु यरूशलेमेच्या संजीवनात हनन्या आणि सप्पीरा खोटे बोलले आणि त्यांनी मंडळीला देण्याच्या त्यांच्या देणगीत थोडाफार फेरबदल केला आणि त्यांना मरण आले (प्रे. कृत्ये ५:१—१०). पण हा कठोर न्याय झाला!

## अलौकिक प्रदर्शने आणि स्वर्गदूतांची भेट

प्रारंभिक मंडळीने आरोग्यदान आणि चमत्कार याशिवाय, अलौकिक प्रदर्शने आणि स्वर्गदूतांच्या भेटींचा अनुभव घेतला. प्रेषितांची कृत्ये ४:३१ यात लिहिले आहे, “त्यांनी प्रार्थना केल्यावर ज्या जागेत ते जमले होते ती हादरली आणि ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन देवाचे वचन धैर्याने बोलू लागले.” हे केवळ भूमीचे कंपन नव्हते, पण ज्याठिकाणी ते सभा घेत होते ती जागा हादरली. कल्पना करा की आपण प्रार्थनासभेत आहा आणि आपणास असे वाटते की इमारत हादरत आहे पण खरोखर काहीही कोसळत नाही. प्रे. कृत्ये ५:१९—२१ मध्ये म्हटले आहे की स्वर्गदूत आले आणि त्यांनी प्रेषितांस तुरूंगातून बाहेर काढले. प्रे. कृत्ये ८:२६ मध्ये म्हटले आहे की एका स्वर्गदूताने फिलिप्पास एकांत स्थळी अरण्यात जाण्याची आज्ञा दिली. वृष्टीच्या म्हणजे संजीवनाच्या काळात स्वर्गदूतांचे कार्यकलाप व स्वर्गदूतांची सेवा वाढीस असेल.

## आंतरिक समस्येपासून वंचित नाही

वृष्टीच्या आणि संजीवनाच्या काळात, मंडळी आंतरिक समस्येपासून दूर असणार नाही. कधी कधी आमचे असे चुकीचे मत असते की देवाचे सामर्थी संजीवन असल्यामुळे, मुळीच समस्या असणार नाहीत. ह्या कल्पनेविपरीत, यरूशलेमेतील मंडळीने समस्येचा अनुभव केला. सर्वप्रथम त्यांस समस्येला तोंड द्यावे लागले, ती समस्या म्हणजे विधवांतील वाद होता. काही ग्रीक भाषा बोलणाऱ्या विधवा होत्या आणि काही इब्री भाषा बोलणाऱ्या विधवा होत्या. काहींना वाटले की अन्नाच्या वाटपात त्यांना योग्य वागणूक दिली जात नाही (प्रे. कृत्ये ६). आणि अशाप्रकारे तेथे वाद घडून आला, पण प्रेषितांनी देवाच्या बुद्धीने कार्य केले आणि समस्येचे समाधान केले.

मुद्दा हा आहे की आमच्या संजीवनात सुद्धा आंतरिक समस्या असू शकतात आणि त्या सर्वांस आम्ही देवाच्या बुद्धीने तोंड दिले पाहिजे आणि त्यांस घाबरता कामा नये. दुसरी उल्लेखनीय गोष्ट ही आहे की पुढाऱ्यांनी असे ठरविले की ते स्वत:स सतत वचनाच्या आणि प्रार्थनेच्या सेवेस वाहून देतील — जे खरोखर महत्वाचे होते त्या गोष्टींत. पुढाऱ्यांनी अशा गोष्टींवर लक्ष लावले ज्या खरोखर महत्वाच्या होत्या — संजीवनात नेतृत्व पुरविणे. देवाचे अनुसरण करीत असतांना हा आमच्यासाठी महत्वाचा धडा आहे. आम्ही पुढाऱ्यांस गौरव न देण्याबाबत सावध असले पाहिजे. संजीवन एका व्यक्तीवर आणि सेवेवर केंद्रित असता कामा नये. आणि तरीही, आपण संजीवनाच्या पुढारीपणाचे, नेतृत्वाचे महत्व

समजले पाहिजे — पुढाऱ्यांनी त्यांचे स्थान घ्यावे, त्यांनी काय करावे असे देवास वाटते या बाबत त्यांनी जबाबदार असावे आणि त्यावर लक्ष लावावे. याद्वारे संजीवनाची वाढ, वृद्धी होण्यात मदत होईल, आणि संजीवनाचा ओघ कमी होणार नाही. वेल्श संजीवनाबाबत ही एक दु:खाची बाब आहे.

ईव्हान रॉबर्ट्स संजीवनाच्या मुख्य नेत्यांपैकी एक होता आणि खरे म्हणजे संजीवन कळसास पोहोचल्यानंतर तो विख्यात झाला, पण काहीतरी दु:खद असे घडले. तो अचानक त्या नेतृत्वपदावरून बाहेर झाला. ईव्हान रॉबर्ट्सला मानसिक आणि शारीरिक दौर्बल्य आले — थकवा. लगभग एका रात्रीतच तो त्या पुढारीपणातून बाहेर झाला आणि त्याने बाकीचे बहुतेक जीवन एकांतवासात घालविले — लेखन करण्यात आणि प्रार्थनेत. वेल्शच्या संजीवनात देवाने ज्याचा सामर्थ्याने उपयोग केला अशा व्यक्तीचा एक अत्यंत दु:खद शेवट!

संजीवनात पुढारीपण हे अत्यंत महत्वाचे असते. आम्ही पुढाऱ्यांस मोठेपणा देण्याचा आणि गौरवान्वित करण्याचा प्रयत्न करीत नाही, पण आम्ही हे समजले पाहिजे की जे संजीवनासाठी नेतृत्वपदावर आहेत, त्यांच्यासाठी हे अत्यंत महत्वाचे आहे की त्यांनी एकाग्र असावे, स्वत:स थकविण्यापासून वाचावे आणि त्याचवेळी जबाबदारी पार पाडावी, कारण जे काही तो आमच्यामध्ये पृथ्वीवर पाठवीत आहे त्याच्यासाठी आम्ही देवास उत्तरदायी आहोत.

## प्रत्येक जण अद्‌भुत कृत्ये करतो

प्रेषितांच्या कृत्यांच्या पुस्तकात, आम्ही नंतर पाहतो की जसजशी

आत्म्याची वृष्टी प्रकट होत गेली, तसतसा प्रत्येक जण अद्भुत कार्ये करू लागला. आम्ही लवकरच स्तेफनाविषयी (प्रे. कृत्ये ६) आणि फिलिप्पाविषयी (प्रे. कृत्ये ८) ऐकू लागतो, ज्यांच्याद्वारे अद्भुत चिन्हे घडून आली. माझा दृढ विश्वास आहे की देव हे पाहू इच्छितो की मंडळीतील प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावात रोग्यांस बरे करीत आहे, दुरात्म्यांस काढीत आहे आणि मृतांस जिवंत करीत आहे. तो पाहू इच्छितो की ह्या शहरातील त्याचे लोक आमच्या शहराच्या मार्गांवर आक्रमण करीत आहेत, देवाचे गौरव प्रकट करीत आहेत. प्रत्येक विश्वासणारा मार्गांवर, जेथे कोठे गरजवंत लोक आहेत तेथे सामर्थ्याची कामे आणि अद्भुत कृत्ये प्रकट करील. आणि देव मंडळीस त्याच ठिकाणी आणू इच्छितो आणि देवाच्या संजीवनात अगदी हेच घडून येईल. तुम्ही आणि देवाचे गौरव सडकांवर, बाजाराच्या ठिकाणी आणि लोक जेथे कोठे आहेत, तेथे वाहून नेऊ!

## आग पसरते

संजीवनाची आग पसरते! यरूशलेमात शाऊलाच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या छळामुळे, विश्वासणारे विखुरले, पण जेथे कोठे ते गेले तेथे ते आपणासोबत संजीवनाची आग घेऊन गेले. ते शमरोनात आणि यहूदियांत गेले आणि ती ठिकाणे संजीवनाच्या आगीने पेटून उठली (प्रे. कृत्ये ८). काही लोक अंत्युखियास गेले आणि अंत्युखियात संजीवनाची ज्वाला पसरली (प्रे. कृत्ये ११). सामान्य विश्वासणारे जेथे कोठे गेले, तेथे ते आपल्यासोबत संजीवनाची आग घेऊन गेले. माझा विश्वास आहे की आमच्यापैकी प्रत्येक

जण ‘संजीवन वाहून नेणारा’ बनेल — देवाची वृष्टी वाहून नेणारा.

आम्हास संजीवनातून बाहेर काढणारा छळ असू शकतो अथवा नसू शकतो. कदाचित नवीन नोकरी, आमच्या नोकरीत बदली, इत्यादी कारणे असू शकतात. अनेक कारणे असू शकतात ज्यामुळे आम्हाला बँगलोर शहरातून बाहेर जावे लागू शकते. पण जेव्हा आम्ही जाऊ, तेव्हा देवाच्या आत्म्याची वृष्टी घेऊन जाऊ! आम्ही देवाची आग घेऊन जाऊ आणि जगाच्या इतर भागांस प्रज्वलित करू! आणि हीच संजीवन प्राप्त मंडळी आहे!

देव जे काही करीत आहे त्यात, संजीवनप्राप्त मंडळी होणे आमच्या रोजच्या जीवनांस प्रभावित करील; आमच्या मंडळीतील जीवनावरही त्याचा प्रभाव पडेल, जे आम्ही आणतो. पण ते मौल्यवान आहे कारण जर आमचे शहर बदलावयाचे असेल, तर त्यासाठी देवाच्या संजीवनाची गरज आहे. जर आमच्या शहरावर छाप पाडावयाची असेल, तर याचा अर्थ हा आहे की आज आमच्याजवळ जे आहे त्यापेक्षा अधिक आम्हास देवापासून हवे आहे.आमच्या शहरात जे काही घडले आहे त्याविषयी आम्ही आभारी आहोत, पण त्या लोकांचा विचार करा जे अद्याप आमच्या शहरात येशू ख्रिस्ताला ओळखत नाहीत. अद्याप लक्षावधी लोक आहेत जे येशू ख्रिस्ताला ओळखत नाहीत. जर आम्हाला आमच्या शहरावर प्रभाव टाकावयाचा असेल, तर आपणास देवाच्या आत्म्याची सामर्थ्यवान वृष्टी हवी आहे. आम्हा देवाकडून संजीवन हवे आहे. आज आम्ही ज्या संजीवनात वाटचाल करीत आहोत त्यापेक्षा आम्हाला अधिक हवे आहे आणि याचा अर्थ हा आहे की तुम्ही आणि मी त्यात पुढे

गेले पाहिजे. आपण देवास सामर्थ्यवान संजीवन, त्याच्या आत्म्याचा जबरदस्त वर्षाव मागावयास इच्छुक आहोत काय? आपण संजीवन प्राप्त मंडळी बनण्याकडे पुढे वाढू या!

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषत: उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यांस स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यांसाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यांस वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बैंक ड्रॉफ्टच्या द्वारे “ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर” च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

Account Name: All Peoples Church
Account Number: 0057213809
IFSC Code: CITI0000004
Bank: Citibank N.A., No. 5, M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

*कृपया लक्षात ठेवा: ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.*

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

# विनामूल्य प्रकाशने

१. आपल्या जीवनासाठी परमेश्वराचा हेतू पूर्ण करणे
२. संजीवनकाळातील मंडळी
३. राज्याची स्थापना करणारे
४. संजीवनकाळातील मंडळी

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर **apcwo.org/publications** उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्या पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई—मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा.

तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (१ करिंथ २:४, ५; इब्री. २:३, ४). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे समार्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्याावी : : **www.apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई–मेल पाठवावा : **contact@apcwo.org**

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे २००० वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रकट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यांस आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रकट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आोति. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या

मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, “पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे” (रोमियों ६:२३). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वत:ला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास — आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे — प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंत:करणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात” (प्रेषितांची कृत्ये १०:४३).

“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंत:करणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल” (रोम. १०:९).

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस : तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.

आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वत:चे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंत:करणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

नोट्स

नोट्स


नोट्स

# DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*